## संक्षिप्त वृत्त

### पतीच्या आत्महत्येस कारणीभूत पत्नीसह तिघांचा जामीन फेटाळला

**सोलापूर :** पतीच्या आत्महत्येस कारणीभूत असल्याच्या आरोपावरुन तुरुंगात असलेल्या पत्नीसह तिघांचा जामीन अर्ज बुधवारी जिल्हा व सत्र न्यायालयाने फेटाळला. वरील प्रकरणात मयत प्रशांत वसंत इंदापूरे (रा. कोटानगर, जूना विडी घरकुल) यांनी दि.२१/११/२३ रोजी आत्महत्या केली होती. पत्नी अस्मिता इंदापूरे, तिचा प्रियकर अक्षय जनार्दन महाकाळ, मेहुणा अक्षय जनार्दन काडगी व सासरा ज्ञानेश्वर काडगी या चौघांनी मानसिक त्रास दिला तसेच पत्नी व तिच्या प्रियकराने जीवे मारण्याची धमकी दिल्याने आत्महत्या केल्याचे आत्महत्येपुर्वी चिठ्ठीत लिहून ठेवले होते. त्यावरुन चौघांविरुद्ध एमआयडीसी पोलिस स्टेशनमध्ये भादंवि ३०६,३४ प्रमाणे गुन्हा नोंद झाला होता. पत्नीसह प्रियकर व मेव्हण्याला अटकही झाली होती. तद्नंतर आरोपींनी जिल्हा व सत्र न्यायालयात जामीनासाठी अर्ज केला होता. मयताचा भाउ फिर्यादी नितीन इंदापूरे यांनी त्याला विरोध दर्शवला होता. सरकारी वकीलांनीही मयताच्या मृत्यूस वरील तीन आरोपीच कारणीभूत असल्याचे निदर्शनास आणून दिले होते. त्यानुसार न्यायाधीश पांढरे यांनी जामीन अर्ज फेटाळला. खटल्यात आरोपींतर्फे ॲड. प्रशांत नवगिरे, ॲड. मुनिनाथ कारमपुरी, सरकारतर्फे ॲड. दत्ता पवार, मुळ फिर्यादीतर्फे ॲड. रविराज सरवदे, ॲड. कपिल चलवादी यांनी काम पाहिले.

### सिद्धरामेश्वरांच्या यात्रेनिमित्त सोलापुरात कृषी महोत्सव

**सोलापूर :** राज्य शासनाच्या कृषि विभागामार्फत येत्या २८ डिसेंबरपासून १ जानेवारी २०२४ पर्यंत जिल्हा कृषी महोत्सवाचे आयोजन केले आहे. होम मैदानावर महोत्सव होत असून ग्रामदैवत सिद्धरामेश्वराच्या यात्रेनिमित्त कृषि प्रदर्शनाचेही आयोजन केले आहे. महोत्सवात शासकिय विभाग व कृषि संलग्न विभागांची दालने लावण्यात येणार आहेत. दालनातून शासकिय योजनांची माहिती दिली जाणार आहे. आंतरराष्ट्रीय मिलेट वर्षानिमित्त मिलेटपासून निर्मित उपपदार्थ विक्रीस उपलब्ध होणार आहेत. शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी बचत गट व शेतकरी महिला बचत गटांची विविध उत्पादनेही विक्रीस उपलब्ध होणार आहेत. महोत्सवात कृषिची १०८ दालने असणार आहेत. त्यात पिकांचे नमूने, विविध जातींची फळे, फुले, भाजीपाला, धान्ये, सेंद्रिय शेतमाल व उपपदार्थ यांचा समावेश आहे. नागरिकांनी महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

# आयुष्यमान कार्ड काढण्यात सोलापूर जिल्हा अग्रेसर

# तीन महिन्यात साडेसहा लाख कार्ड; राज्यात केला ९२ लाखांचा टप्पा पार

**सुराज्य/सोलापूर**



पाच लाखाच्या कौटुंबिक आरोग्य विमा असलेल्या राज्य व केंद्र सरकारच्या आयुष्मान भारत जन आरोग्य योजनेत सोलापूर जिल्ह्याने आघाडी घेतली आहे गेल्या तीन महिन्यात राज्यात सर्वाधिक ३२९००० आयुष्मान कार्ड सोलापूर जिल्ह्याने लाभार्थींना दिले आहेत.

दरम्यान राज्यात गेल्या तीन महिन्यात एकूण ९२ लाख ६९ हजार कार्ड काढण्यात आले आहेत. प्रारंभी केवळ दुर्बल घटकांतील लाभार्थ्यांना असलेली आयुष्मान भारत जन आरोग्य योजना आता टप्प्याटप्प्याने सर्वांनाच लागू होत आहे. केंद्राच्या आयुष्यमान भारत योजनेद्वारे पाच लाखापर्यंतचे उपचार मोफत केले जातात. दुसरीकडे राज्यात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना राबवण्यात येत होती. आता या दोन्ही योजना एकत्र करण्यात आल्या असून, दोन्ही योजनेचे मिळून एकच गोल्डन कार्ड देण्यात येत आहे. त्यामुळे सर्वच शिधापत्रिकाधारक आणि महाराष्ट्र राज्याचे रहिवास प्रमाणपत्र असणाऱ्या या योजनेचा फायदा होणार आहे. जिल्ह्यात प्रधानमंत्री जन आरोग्य योजना .. लाख ..११५९३५८. हजार तर महात्मा फुले योजनेच्या ११८८१९७ लाभार्थी आहेत असे एकूण .२३४७५५५ लाभार्थ्यांना आता आयुष्यमान कार्ड वाटप आरोग्य विभागामार्फत सुरू आहे. त्यापैकी गेल्या तीन महिन्यात ७३३९५४ कार्ड काढले असून दरम्यान हे कार्ड काढण्यात सोलापूर जिल्ह्यात आघाडी घेतलेली आहे. गेल्या तीन महिन्यात म्हणजे १३ सप्टेंबर पासून १७ डिसेंबर पर्यंत राज्यात एकूण ९२ लाख ५९ हजार ७१४ आयुष्मान कार्ड काढण्यात आले. आहेत त्यात सर्वाधिक ३२९००० सोलापूर जिल्ह्यात अग्रेसर क्रमांक वर आहे.

#### जिल्ह्यातील ५१ अंगीकृत रुग्णालयात उपचार मिळणार

५१ अंगीकृत रुग्णालयात उपचार मिळणार आहेत. या योजनेअंतर्गत प्रती वर्ष प्रती कुटुंब ५ लाख रुपयाचे आरोग्य कवच मिळणार आहे. ४ जिल्हा रुग्णालय व ४७ खाजगी रुग्णालयाची निवड करण्यात आलेली आहे. त्यामध्ये ग्रामीण भागात ४० व सोलापूर ११ रुग्णालय असून कोणतेही रुग्ण या रुग्णालयात पाच लाखापर्यंतचे मोफत उपचार घेऊ शकतो. जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ नवले यांनी केले आहे.

# पंढरपूर-घुमान रथ; सायकल यात्रेची पंढरपूरमध्ये सांगता

**सुराज्य/वेळापूर**

भागवत धर्माचे प्रचारक संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांची ७५३ वी जयंती, कैवल्य साम्राज्य चक्रवर्ती श्री ज्ञानेश्वर माऊलींचा ७२७ वा संजीवन समाधी सोहळा, शिख धर्माचे संस्थापक श्री गुरुनानकदेव यांच्या ५५४ व्या जयंतीनिमित्त श्री क्षेत्र पंढरपूर (महाराष्ट्र) ते श्री क्षेत्र घुमान (पंजाब) अशा सुमारे २१०० किलोमीटरच्या रथ, सायकल यात्रेचा समारोप श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीचे अध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते पंढरीतील श्री विठ्ठल



पंढरपूरः पंढरपूर ते घुमाण रथ व सायकल यात्रेच्या सांगताप्रसंगी संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांच्या पादुका श्री विठ्ठल चरणी भेट करताना सूर्यकांत भिसे, माऊली जळगांवकर, संभाजीराजे शिंदे, राजेंद्र शेळके.

रूक्मिणी मंदिरात झाला. यात्रेचे यंदाचे हे दुसरे वर्ष होते.

संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांच्या श्री क्षेत्र पंढरपूर (महाराष्ट्र) या जन्मभूमी ते तिर्थक्षेत्र असलेल्या श्री क्षेत्र घुमान (पंजाब) या कर्मभूमीपर्यंत भागवत धर्म प्रसारक मंडळ, पालखी सोहळा पत्रकार संघ, श्री नामदेव दरबार कमिटी घुमान व देशभरातील विविध नामदेव शिंपी समाज संघटनांच्यावतीने शांती, समता, बंधूता या संत विचारांचा व संत साहित्याचा प्रचार, प्रसार करीत श्री क्षेत्र पंढरपूर ते श्री क्षेत्र घुमान अशी रथ, सायकल यात्रा काढण्यात आली होती. महाराष्ट्र, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, दिल्ली, हरियाणा, पंजाब, राजस्थान व गुजरात या राज्याचा एक महिन्याचा दौरा करुन ही यात्रा शनिवारी श्री क्षेत्र पंढरपूर मुक्कामी परतली.

पंढरपूर येथे संत नामदेव महाराज पादुकांची पूजा व अभिषेक माऊली प्रतिष्ठानचे अध्यक्ष दीपकसिंह पाटणकर व त्यांच्या सुविद्य पत्नी यशश्रींदेवी पाटणकर या उभयतांच्या हस्ते झाली. ही रथ व सायकल यात्रा शनिवार दि. २३ डिसेंबर रोजी श्री क्षेत्र पंढरपूर येथे पोहोचेली. या यात्रेच्या समारोपप्रसंगी श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीचे विश्वस्त माऊली महाराज जळगांवकर, संभाजीराजे शिंदे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, नामदेव महाराजांचे १७ वे वंशज ज्ञानेश्वर माऊली नामदास, भागवत धर्म प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सूर्यकांत भिसे यांच्यासह हजारो वारकरी उपस्थित होते.

### मंद्रूपचे क्रिकेटपटू मुन्ना शेख यांचे निधन

**दक्षिण सोलापूर :**



सोलापूरसह संपूर्ण महाराष्ट्र व कर्नाटकात फलंदाजीत चमकणारा मंद्रूपचा एक अद्वितीय तारा राज्य राखीव पोलीस दलात कार्यरत असणारे मुन्ना शेख यांचे शनिवार, दि. २३ डिसेंबर रोजी निधन झाले. मुन्ना शेख हे गेल्या एक महिन्यापासून आजारी होते. त्यांच्यावर सोलापुर येथील अश्विनी रूग्णालयात उपचार सुरू होते. उपचारा दरम्यान त्यांचे शनिवारी दुपारी चार वाजण्याच्या निधन झाले.



### बंद पडलेल्या सुपर मार्केटमध्ये अवैद्य धंद्यांचा सुळससुळाट

**सुराज्य/वेळापूर**

सुपर मार्केट हे एकेकाळी नावाजलेले मार्केट होते. सध्या या मार्केट बंद अवस्थेत आहे. या मार्केट परिसरात मोठ्या प्रमाणात आता अवैद्य धंद्यांचा सुळसुळाट झाला आहे. दारू धंदे , गांजा विक्री, आणि इतर आपली पदार्थांची खुलेआम विक्री केली जाते. या परिसरात मद्यपी लोकांचा वावर असतो. या परिसरात छत्रपती शिवाजी प्रशाला, संभाजी प्रशाला, सेवासद प्रशाला, नाईट कॉलेज आहे. या शाळेतील विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात त्रासाला सामोरे जावे लागते लागत आहे. त्यामुळे या अवैध धंद्यांना लगाम घालावा अशी मागणी या शाळेतील मुख्याध्यापकांनी पोलीस आयुक्त राजेंद्र माने यांच्याकडे केली आहे. अमली पदार्थाच्या व्यवहारांमध्ये विक्री माध्यमातून सोलापूरचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचले आहे. असे असताना पोलीस प्रशासन मात्र या सुपर मार्केट परिसरात होणाऱ्या अवैद्य धंद्यांकडे का दुर्लक्ष का ? असा प्रश्न निर्माण झाला आहे. या परिसरातून जाणाऱ्या विद्यार्थ्यांना पद्यपी लोकांकडून किंवा गर्दुल्या लोकांकडून विद्यार्थिनी तसेच विद्यार्थ्यांना त्रास देणे त्यांची छेड काढणे तसेच त्यांना दम दटी करून करण्याचे प्रकार देखील अनेक वेळा निदर्शनास आलेले आहेत. यातून काही मोठा घातपात घडण्यावची शक्यता आहे. या परिसरातील अवैध धंद्यांना लगाम घालावा अशी मागणी निवेदनाच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी प्रशालेचे प्राचार्य अनिल बारबोले, राजेंद्र शिंदे, श्रीपती जगदाळे, सुरेश जगताप, दत्तात्रय सुतार, दत्ता भोसले आदींनी केली आहे.

### पंढरपुरात रेडिमेड दुकानात तीन लाखांचा अपहार; मॅनेजरविरुद्ध गुन्हा दाखल

**सोलापूर :** रेडिमेड कपड्याच्या दुकानात ग्राहकांना बनावट बिल देऊन ३ लाख ७१४ रुपयांचा अपहार केल्याची घटना पंढरपूर येथील ॲटलान्स गारमेंट या दुकानात घडल्याचे नुकतीच उघडकीस आले. या प्रकरणात पंढरपूर शहरच्या पोलिसांनी भीमाशंकर मल्लिकार्जुन जळकोटी (समर्थनगर,पंढरपूर) या मॅनेजरविरुद्ध गुन्हा दाखल केला. यासंदर्भात दुकानाचे मालक अक्षय मल्लिकार्जुन स्वामी (सोलापूर ) यांनी पोलिसात तक्रार दाखल केली. आरोपी भीमाशंकर जळकोटी हा स्वामी यांच्या रेडिमेड कपड्याच्या दुकानात सप्टेंबरपासून मॅनेजर म्हणून करीत होता. त्यावेळी त्याने कंपनीचे ओरिजनल बिल न देता बनावट बिल देऊन ४२९ नग कपड्याचे पैसे स्वःता घेतले होते. ऑडिटवेळी हा प्रकार उघडकीस आला. फौजदार जगताप पुढील तपास करीत आहे.

### इन्स्टाग्रामवर स्टोरी ठेवण्याच्या कारणावरुन फायटरने मारहाण

**सोलापूर :** इंस्टाग्रामवर स्टोरी ठेवण्याच्या कारणावरून फिर्यादी व फिर्यादीच्या मित्राला लोखंडी फायटरने तिघा जणांनी मारहाण केल्याची तक्रार जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे.

फिर्यादी आफताब अतिक शेख यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार संशयित आरोपी बापू आयवळे, अर्जुन जावीर, अवि गायकवाड (धोत्रीकर वस्ती,सोलापूर) यांनी शुक्रवारी दुपारीच्या सुमारास दयानंद महाविद्यालया समोरील कॅन्टीन जवळ येऊन इंस्टाग्रामवर स्टोरी का ठेवली अशी विचारणा करत शिवीगाळ करत लोखंडी फायटरने मारहाण केली.

जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून,अधिक तपास पोलीस हवालदार आर.डी दुधाळे हे करत आहेत.



### अन्नदान सेवेतील उल्लेखनीय कार्याबद्दल आस्था रोटी बँकेचा गौरव

**सोलापूर :** अन्नदान सेवेत उल्लेखनीय कार्य करीत असलेल्या येथील आस्था फाऊंडेशन संचलित आस्था रोटी बँकेचा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या अल्पसंख्याक सेलच्यावतीने सत्कार करण्यात आला. समाजकल्याण हॉलमध्ये येथे हा कार्यक्रम पार पडला. यावेळी ऊर्दू शिक्षक संघटनेचे अध्यक्ष महिबूब तांबोळी, प्रा. डॉ. अब्दुलरहिम गदवाल, अनिल विपत, संतोष गायकवाड, रक्षिता गायकवाड आदी उपस्थित होते. आस्था रोटी बँकेचे विजय छंचुरे, नीलिमा हिरेमठ, संगिता छंचुरे, छाया गंगणे, मंगल पांढरे, प्रतीक्षा लोखंडे यांनी हा सत्कार स्वीकारला.

# वेळापुरात घुमला 'जय श्री राम'चा नारा

## गीता जयंती, अक्षता कलशाची मिरवणूक

### शोभायात्रेत महिलांचा लक्षणीय सहभाग

**सुराज्य/वेळापूर**

जय श्री रामच्या जयघोषात वेळापुरात गीता जयंती उत्सव, अक्षता कलशाची मिरवणूक उत्साही वातावरणात पार पडली. यामध्ये महिलांनी लाक्षणीय सहभाग नोंदविला.श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र आयोध्या येथून प्राप्त झालेल्या अभिमंत्रित अक्षता अमृत कलशाची शोभायात्रा वेळापूर शहरात श्रीरामलल्ला प्रतिष्ठान अक्षता अभियान अयोध्या संयोजक समिती वेळापूर शहर, गीता मंडळ वेळापूर, ग्रामस्थांच्यावतीने आयोजन केले होते.

वेळापूर नगरीचे आराध्य दैवत अर्धनारी नटेश्वर मंदिरात कलश पूजन माजी जि. प. सदस्य सतीषराव माने-देशमुख, अर्धनारी नटेश्वर महादेव देवालय ट्रस्टचे अध्यक्ष अमृतभैया माने-देशमुख, भाजपा तालुका उपाध्यक्ष व वेळापूर सोसायटीचे चेअरमन अमरसिंह माने-देशमुख, धानोरे माजीसरपंच जीवन जानकर यांच्या हस्ते झाले.

पालखीमध्ये श्रीरामाचा फोटो ठेऊन त्याच्यासमोर अक्षता कलश ठेऊन पालखी शोभायात्रेस सुरुवात करण्यात आली. सकाळी गीता मंडळ वेळापूर यांच्यावतीने गीता जयंतीनिमित्त गीता पारायण झाले.



वेळापूर : वेळापुरात गीता जयंती, अक्षता अमृत कलशाची मिरवणूक काढण्यात आली. पूजनप्रसंगी सतीष माने-देशमुख, अमृत माने-देशमुख, अमरसिंह माने-देशमुख, जीवन जानकर आदी.

शोभायात्रा सुतार समाज मंदिर येथे आल्यानंतर गीता मंडळाच्या १०० पेक्षा जास्त महिला वर्ग पांढऱ्या साड्या घालून वेळापूर ग्रामस्थ, हिंदुप्रेमी मोठ्या संख्येने शोभायात्रेत सहभागी झाले होते.

सदर अर्धनारींनटेश्वर मंदिर, राममंदिर, सुतार समाज मंदिर, काळामारुती, व्यापार पेठ वेळापूर, तलाठी कार्यालय या मार्गावरुन शोभायात्रा केली. शोभायात्रेमध्ये महिलांनी फुगडी खेळण्याचा आनंद घेतला. कलश शोभा यात्रेचे उत्तम असे नियोजन केले होते. वेळापूर शहर घोषणांनी श्रीराम मय होऊन गेले होते. शोभा यात्रेच्या मार्गावर ठिकठिकाणी रांगोळी काढल्या होत्या. पुष्पवृष्टी होऊन फटाक्यांची आतिषबाजी करून शोभा यात्रेचे स्वागत केले.

# ग्रामीण गटात मोरोची; शहरी गटात महर्षी प्राथमिक प्रथम

## अकलूज येथील राज्यस्तरीय समूह नृत्य स्पर्धेत १३२ संघांचा सहभाग

**सुराज्य/अकलूज**

स्मृतीभवन शंकरनगर येथे प्रताप क्रीडा मंडळाच्यावतीने शालेय मुला-मुलींच्या व खुल्या गटासाठी आयोजित राज्यस्तरीय समूह नृत्य स्पर्धेत ग्रामीण गटात मोरोची तर शहरी गटात महर्षी प्राथमिक शाळेने प्रथम क्रमांक पटकावला. या स्पर्धेत १३२ संघांनी सहभाग घेतला आहे.

याचे उद्घाटन नामदेव टिळेकर यांच्या हस्ते व मंडळाच्या अध्यक्षास्वरुपाराणी मोहिते-पाटील यांच्या उपस्थितीत झाले.

प्रारंभी सहकार महर्षी व श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते झाले. यावेळी स्पर्धेचे परीक्षक कुणाल मसाले (सांगली), सागर राऊत (मुंबई), रितेश नाग (मुंबई), सुमित्रा पतसंस्थेचे चेअरमन महादेव अंधारे, ॲड. नितीन खराडे-पाटील, मंडळाचे उपाध्यक्ष पोपटराव भोसले-पाटील, शिक्षण प्रसारक मंडळाचे सदस्य बाळासाहेब सणस, वसंतराव जाधव, उत्कर्ष शेटे, बिभीषण जाधव, पोपटराव देठे, अमोल फुले, डॉ. विश्वनाथ आवड उपस्थित होते.



अकलूजः स्मृतीभवन शंकरनगर येथे प्रताप क्रीडा मंडळाच्यावतीने शालेय मुला-मुलींच्या व खुल्या गटासाठी आयोजित राज्यस्तरीय समूह नृत्य स्पर्धेतील प्राथमिक गटातील विजेते महर्षी शंकरराव मोहिते प्राथमिक शाळेसमवेत जयसिंह मोहिते-पाटील, स्वरूपाराणी मोहिते-पाटील, मंडळाचे पदाधिकारी, मुख्याध्यापक, मार्गदर्शक व मान्यवर.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी प्रताप क्रीडा मंडळ मागील ४३ वर्षे अविरत कार्य करीत आहे. हे कौतुकास्पद आहे. अनेक आयडॉल येथूनच घडले असल्याचे उपविभागीय अधिकारी नामदेव टिळेकर यांनी सांगितले.

श्रीमती रत्नप्रभादेवी शंकरराव मोहिते-पाटील यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त व प्रताप क्रीडा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील व अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील या बंधूच्या अमृत महोत्सवी वाटचालीनिमित्त या राज्यस्तरीय समुहनृत्य स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेला मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील यांनी भेट दिली. प्रास्ताविक स्पर्धा प्रमुख संजय गळीतकर यांनी केले. सूत्रसंचलन किरण सूर्यवंशी, आर. आर. पाटील यांनी केले.

शहरी गटात प्रथम क्रमांक- महर्षी शंकरराव मोहिते प्रशाला, यशवंतनगर (जहाँ मे जाती हूं), द्वितीय विभागून- कृष्णानंद विद्यामंदिर, पाटीलवस्ती (गवळण गीत), सदाशिवराव माने विद्यालय, प्राथमिक विभाग (ड्रील डान्स), तृतीय- श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील प्राथमिक विद्यालय, कोथरुड, पुणे (देशभक्तीपर गीत) या विजेत्यांना रोख रक्कम, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र उपस्थितांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले.

#### स्पर्धेच्या पहिल्या दिवशीचे निकाल

गट पहिलाः पहिली ते चौथी या ग्रामीण गटात प्रथम क्रमांक- जि.प.प्राथमिक शाळा, देवबासुळ वस्ती, मोरोची (आदिवासी गीत),
द्वितीय विवेक प्राथमिक विद्यालय, पंढरपूर (जोगवा गीत), तृतीय (विभागून)- लोकविकास मराठी प्राथमिक शाळा, वेळापूर (कोळीगीत), जि.प. शाळा, कर्चेवाडी, पिंपरी (शेतकरी गीत), जि.प.शाळा, वाडी नं.२ (कोळीगीत).